

# एन् जी सी टाईम्स

कास पठार –जागतीक वारसा स्थळ
छायाचित्र: विशाल प्रसाद

## राष्ट्रीय हरीत सेनेच्या कार्यशाळा

सामाजिक वनीकरण विभाग, महाराष्ट्र राज्य व भारती विद्यापीठ पर्यावरण शिक्षण व संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने १२ ऑगस्ट रोजी राज्यातील सर्व विभागीय उपमहा संचालक व उपसंचालक यांची कार्यशाळा पुण्यात घेतली गेली. कार्यशाळेला श्री. देवेंद्र कुमार, नोडल ऑफिसर व डॉ. भरुचा, संचालक, भारती विद्यापीठ उपस्थित होते. डॉ. भरुचा यांनी राष्ट्रीय हरीत सेने मार्फत जैवविविधता नोंद वही कशी बनवता येईल याचे मार्गदर्शन केले व नव्याने सुरुवात झालेला नेचर कॅंपिंग कार्यक्रम किती उपयुक्त आहे त्याविषयी माहिती दिली.




डॉ. भरुचा मार्गदर्शन करतांना

या कार्यशाळेत सर्व जिल्ह्यातील उपसंचालकांनी त्यांच्या जिल्ह्यातील राष्ट्रीय हरीत सेनेच्या माध्यमातून घेतलेल्या कार्यक्रमांचा आढावा घेतला.

या प्रसंगी त्यांनी विशेष करुन ज्या प्रकल्पांना यश मिळाले त्याची यशोगाथा सर्वांसमोर मांडली.या व्यतिरिक्त डॉ. शमिता कुमार यांनी राष्ट्रीय हरीत सेनेच्या माध्यमातून घेतलेल्या एकूण प्रकल्पांपैकी अगदी निवडक अशा अत्यंत नावाजलेल्या प्रकल्पांची यशोगाथा सर्वांसमोर सादर केली. तसेच कार्यशाळेमध्ये डॉ. शमिता कुमार यांनी या वर्षीच्या राष्ट्रीय हरीत सेनेच्या महाराष्ट्रातील काही यशोगाथा दाखविल्या व २०१४-१५ ची वाटचाल काय राहील याविषयी मार्गदर्शन केले. याशिवाय जिल्हास्तरीय कार्यशाळा घेण्याच्याही सर्व उपसंचालकांना सुचना दिल्या. सदर कार्यशाळा दिवसभरासाठी आयोजित केली होती. ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यामध्ये बऱ्याच जिल्ह्यांच्या कार्यशाळा घेण्यात आल्या. भारती विद्यापीठाच्या डॉ. क्रांती यार्दी ह्या कार्यशाळांना उपस्थित होत्या.



डॉ. शमिता कुमार यशोगाथा सादर करतांना - पुणे जिल्हा कार्यशाळा

### ✍ संपादकीय

भारताचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांनी 'स्वच्छ भारत व सुंदर भारत" या उपक्रमाद्वारे स्वच्छतेचे अनन्यसाधारण महत्त्व 'मन की बात" यो रेडिओवरील कार्यक्रमातून भारतीयांना आवाहन केले आहे हे आपणास विदित आहे! याच अनुबंधाने या अंकातून सिंधुदूर्ग विभागातील विद्यार्थ्यां मार्फत पर्यावरण रक्षणाचा एक अभिनव उपक्रम आपणापुढे विषद केला आहे. त्याच प्रमाणे मोठ्या पारंब्या पासून वडाच्या झाडाची निर्मिती व लागवड, प्लॅस्टिक पिशवीला पर्याय कापडी पिशवी इ. नाविन्यपूर्ण प्रकल्प सन २०१३-१४ मध्ये हरित सेनेच्या विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे राबविल्याचे दिसून येते. या यशोगाथा वाचून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण / प्रदूषण नियंत्रणाविषयी जागृती निर्माण होईल. तसेच सर्वांना भेडसावणारा प्रश्न म्हणजे घरातील कचऱ्याची विल्हेवाट लावणे याविषयी अतिशय सोप्या पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावून घरच्या घरीच अथवा सोसायटीच्या प्रांगणात सुदृढ बगिचा तयार करण्याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. याचा उपयोग सर्वांना निश्चितच होईल अशी आशा आहे.

श्री. देवेंद्र कुमार
केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, पुणे

मुख्य संपादक
केंद्रस्थ अधिकारी,
राष्ट्रीय हरित सेना, महाराष्ट्र

संपादक मंडळ
कार्यकारी संपादक: श्री. भालेकर पी. बी.
सहाय्यक संपादक: सौ. पाटील एन. एस.

सह संपादक व डिझाइन
रिसोर्स एजन्सी,राष्ट्रीय हरित सेना,
भारती विद्यापीठ
पर्यावरण शिक्षण व संशोधन संस्था, पुणे.

## सामाजिक वनीकरण सिंधुदूर्ग विभागाचा पर्यावरण रक्षणाचा एक उपक्रम

सिंधुदूर्गचा समुद्रकिनारा अनेक वैशिष्ट्यांमुळे सुपरिचित आहे. येथील जैव विविधता व निसर्गसौंदर्यामुळे अनेक पर्यटक किनाऱ्यांना भेटी देतात. किनाऱ्यांचे सौंदर्य टिकविणे ही सर्वांची जबाबदारी आहे. कचऱ्याचे प्रदूषण ही सध्याची सर्वात मोठी समस्या निर्माण झाली आहे. या कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP), भारत सरकार व जीईएफ अनुदानित प्रकल्पांतर्गत सिंधुदूर्ग सागरी किनाऱ्यावर स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले होते.



राष्ट्रीय हरित सेना विद्यार्थ्यांमार्फत सागरी स्वच्छता अभियान



शालेय विद्यार्थ्यांमार्फत ३५ सागर किनारे स्वच्छ

सागरी जैविक विविधता प्रकल्प अंतर्गत सिंधुदूर्ग जिल्हा व सामाजिक वनीकरण विभागाच्या संयुक्त विद्यमाने सागरी स्वच्छता अभियान राष्ट्रीय हरित सेना विद्यार्थ्यांमार्फत २ ऑक्टोबर २०१४ रोजी आयोजित करण्यात आले होते. सागरी जैव विविधतेवर कचऱ्याच्या प्रदुषणाचा विपरीत परिणाम होऊ नये यासाठी शालेय विद्यार्थी व स्थानिकांमध्ये या अभियानाद्वारे जनजागृती करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या प्रकल्पाअंतर्गत जिल्ह्यातील देवगड, मालवण, वेंगुर्ला या तीन तालुक्यातील ३५ समुद्रकिनाऱ्यांवर हे अभियान राबविण्यात आले.

या सागरी किनारा स्वच्छता अभियानात राष्ट्रीय हरित सेनेच्या माध्यमातून जिल्हयातील विविध प्रशालातील २२०० शालेय विद्यार्थ्यांमार्फत ३५ सागर किनारे स्वच्छ करण्यात आले. या स्वच्छता अभियानात एकाच दिवशी एका वेळेला सर्व किनारे साफ करण्यात आले. हे स्वच्छता अभियान वर्षातून दोन वेळा २ ऑक्टोबर २०१३ व १२ जानेवारी २०१४ ला आयोजित केले गेले. हे आयोजन करताना सामाजिक वनीकरणाचे उपसंचालक श्री. शेंडगे यांचा सहभाग महत्वाचा होता. कित्येक टन कचरा या अभियानातून गोळा करण्यात आला. समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता व सागरी पर्यावरणाविषयी

जनजागृती करण्यासाठी या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

ह्या कार्यक्रमाला सिंधुदुर्ग जिल्ह्याचे मा. जिल्हाधिकारी ई. रवींद्रन उपस्थित होते व त्यांच्या हस्ते कार्यक्रमाचे १२ जानेवारी रोजी उद्घाटन झाले.



मा. जिल्हाधिकारी ई. रवींद्रन त्यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन

## वडाच्या रोपांची निर्मिती व लागवड एका अनोख्या पद्धतीने करण्याचा प्रयत्न

वडाच्या झाडाला परिसंस्थेमध्ये मोलाचे स्थान आहे. ह्या झाडांची फळे प्राणी, पक्षी आवडीने खातात. ह्या झाडांचा उपयोग घरटी बांधण्यासाठीपण करतात. पुर्वी वडाची झाडे रस्त्यांच्या दुतर्फा लावली जायची. परंतु नजीकच्या काळात रस्ता रुंदीकरणामध्ये सर्व ठिकाणी वटवृक्षांची तोडणी झाली परंतू नवीन झाडे काही लावली गेली नाहीत. अनेकांना वडाची झाडे कशी तयार करावी हा मोठा प्रश्न असतो व त्याची रोपे रानवनांत/रोपवाटिकेत सहजासहजी उपलब्ध होत नाहीत म्हणून वडाची रोपे करण्याचा एक अनोखा उपक्रम एका शाळेने केला त्याविषयी माहिती


२५ फूट उंचीच्या वडाच्या पारंबी असलेल्या फांदीचे वृक्षारोपण

पुणे जिल्ह्यातील वाघीरे विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय या शाळेने एका वेगळ्या पद्धतीने वडाच्या झाडांची निर्मिती करण्याचा उपक्रम केला आहे. शाळेने त्यांच्या आवारात २५ फूट उंचीच्या वडाच्या पारंबी असलेल्या फांदीचे वृक्षारोपण केले. हे वटवृक्षाचे २५ फूट उंचीचे रोप पण त्यांच्या शाळेच्या आवारात असणाऱ्या एका जुन्या वडाच्या झाडापासून तयार केले. ह्या झाडाची उंची एका वर्षात २५ फुटाच्या वर गेली आहे. अशी पद्धत वापरुन आपण पण वडाची झाडे तयार करु शकतो.

याकरीता शाळेने जी पद्धत वापरली ती पाहूयात.

१. ४ × ४ फूट आकाराचा ४ फूट खोलीचा जमिनीत खड्डा घेतला.

२. त्यामध्ये कंपोस्ट खत, माती यांचे मिश्रण टाकले.

३. २५ फूट लांबीची फांदी पारंब्यासह घेवून तिच्या वरच्या फांद्या करवतीने कापल्या व फक्त तीन छोट्या फांद्या ठेवल्या.

४. फांदी पारंब्यासह खड्डयात उभी ठेवून पारंब्या चारही बाजूस पसरवून त्यावर माती टाकली व पाणी घातले.

५. १५ दिवसांनंतर झाड तजेलदार दिसू लागले व महिन्यानंतर फांदीवर नवीन अंकुर फुटून झाड हिरवेगार झाले.


वटवृक्षांची लागवड

सध्या झाडाची उंची २५ फूट असून त्याच्या चारही बाजूस फांद्या वाढत आहेत. वडाच्या नवीन झाडावर बसणाऱ्या पक्षांची विष्टा पडून त्यांच्या बुंध्याजवळ पिंपळ व उंबर वृक्षांची रोपे एका वर्षात तयार झाली आहेत. शाळेनी तयार केलेली अशी कित्येक वडाची रोपे सामाजिक वनीकरण विभागाने सासवडच्या आजूबाजूच्या परिसरात लावली आहेत ह्या पद्धतीचा फायदा हा की वडाचे रोपाचे नव्हे तर झाडाचे पुनर्रोपन होते त्याची जिवंत जगण्याची खात्री ही १००% आहे. ही पद्धत आपणही वापरु शकतो व वटवृक्षांची लागवड करु शकतो.

## प्लास्टिक पिशवीला पर्याय कापडी पिशवी

२६ जुलै २००५ रोजी आलेला मुंबईतला पूर व त्या घटनेला त्यावेळी झालेली अतिवृष्टी आणि प्लास्टिकच्या कचऱ्यामुळे तुंबलेली गटारे ही कारणीभूत होती. म्हणून सावित्रीदेवी थीरानी विद्या मंदिर ठाणे यांनी प्लास्टिकचा वापर कमी करण्यासाठी कापडी पिशवी बनविण्याचा प्रकल्प ठरविला व त्याला सर्वतोपरी मदत केली I ती सामाजिक वनीकरण, ठाणे विभागाने शाळेच्या मुख्याध्यापकांनी सर्व शिक्षकांची मिटींग बोलवली व कापडी पिशवी प्रकल्प राबविण्याचा निर्णय सांगितला व शिक्षकांनी सुद्धा उपक्रम उचलून धरला. शाळेच्या पालकसभेत त्यांनी पालकांना घरातील जुन्या साड्या, पडदे वगैरे आणून द्यायचे आव्हान केल व हळूहळू बऱ्याच गोष्टी जमा झाल्या. एका महिन्यात ५५ जुन्या साड्या गोळा झाल्या. ह्या साड्यांचे काय करायचे हा विचार मुख्याध्यापकांना आला व पुढे जाण्यासाठी पालक हेच उत्तर होते. गरजू ३५ पालक व १२ विद्यार्थी यांनी पिशव्या बनविण्याची जबाबदारी घेतली पिशव्या तयार झाल्या मग ते लोकांच्या पर्यंत पोहचविण्याचे काम हरीत सेनेच्या मुलांनी केले. घरादारात, दुकानात, मंडईत जाऊन पिशव्या विकल्या. जुन्या कापडापासून २७०० पिशव्या केल्या व विकल्या पण आलेल्या पैशांतून पालकांना पण पिशवीमागे मानधन दिले व पुढचे पाऊल म्हणून पुढच्या ९००० पिशव्या तयार केल्या. प्रत्येक व्यक्तीला ६००/- रुपये ते १०००/- रुपये पर्यंत मानधन मिळाले व सुमारे १२ लाख जनतेपर्यंत ह्याचा प्रचार प्रसार केला. एका शाळेच्या उपक्रमाद्वारे कापडी पिशव्यां विषयी मोठ्या प्रमाणात जनजागृती होण्यास मदत झाली. सदरचा उपक्रम निश्चित अनुकरणीय आहे पर्यावरण प्रेमींना व इकोक्लबना. यालाच म्हणतात आम के आम और गुठलीओ के दाम


हरीत सेनेच्या मुलांनी दुकानात जाऊन पिशव्या विकल्या.


२७०० पिशव्या केल्या व विकल्या

# चला, करू या...

'नको प्लॅस्टिक
नको कचरा,
मिळूनी सारे करुया
आपली सुंदर धरा'

स्वच्छ व सुंदर परिसर प्रत्येकाला हवाहवासा वाटतो, पण त्यासाठी आपण पुरेसे प्रयत्न करतो का? आपला खारीचा वाटासुद्धा खूप मोठा बदल घडवून आणू शकतो, फुल नाही तर फुलाची पाकळी म्हणून स्वच्छतेचा दिवा निश्चित उजळू शकतो!

## चला तर, सुरवात करुया आपल्या प्रकल्पाला...

१) वापरात नसलेला ड्रम घेऊन त्याच्या वरच्या भागात समोरासमोर ३ से.मी. व्यासाचे २-३ व खालच्या भागात सर्व बाजूंनी काही छोटी छिद्रे पाडा.



२) या प्रकल्पाला आवश्यक असलेले साहित्य उदा. माती, वाळू, शेणखत, विटांचे तुकडे, नारळाच्या शेंड्या, पालापाचोळा, पाणी, गांडूळखत, पोतं इत्यादी गोळा करा.

३) आपण सर्व प्रकारचा कचरा वापरू शकतो का? निश्चितच नाही- केवळ ओला कचरा. परंतु ओला व सुका कचरा म्हणजे काय?

**ओला कचरा**



भाजीची देठे, शिळे अन्न, मांस, मटण, फळांच्या साली, पालापाचोळा, इत्यादी

**सुका कचरा**



काच, प्लॅस्टिक, खिळे, रबर, कागद, तार, इत्यादी

४) ड्रममध्ये थरांची रचना व त्याचा क्रम योग्य असणे आवश्यक आहे.

- पहिला थर- सर्वात खालचा- विटांचे तुकडे
- दुसरा थर-पहिल्या थराच्या वर- नारळाच्या शेंड्या
- तिसरा थर-दुसऱ्या थराच्या वर- माती
- चौथा थर-तिसऱ्या थराच्या वर- शेणखत
- पाचवा थर- सर्वात वरचा थर- ओला कचरा

ड्रममध्ये विविध फुलांची रोपे लावावी. जेणेकरून वरच्या भागातील मोठ्या छिद्रांमधून रोपे बाहेर येतील.



## चला आपला सुदृढ बगीचा तयार. . .

## आवाहन

या त्रैमासिककरिता आपल्या शाळेतील नाविन्यपुर्ण उपक्रमाची थोडक्यात माहिती द्यावी. तसेच सर्व वाचकांना काही लेख/ उद्बोधक माहिती द्यावयाची असल्यास त्यांनी रिसोर्स एजन्सीला admin@bvieer.edu.in यावर ईमेल करावा. या अंकात लेखकांनी व्यक्त केलेली मते ही एन.जी.सी. टाईम्सची असतीलच असे नाही. एन.जी.सी. टाईम्ससाठी पाठविलेले लेख, फोटो व साहित्य हरविल्यास किंवा खराब झाल्यास त्याची जबाबदारी आमच्यावर राहणार नाही व याबाबत कोणतेही दावे मान्य केले जाणार नाहीत.